दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.२२ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ३७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 22 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 37 ● Pages 4 ● Rate 4 Rs




# लवकरच शेतकऱ्यांना मिळणार मदत
# कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे आश्वासन
## राज्यातील पाऊस थांबताच शेती नुकसानीचे पंचनामे

**अकोला (वृत्तसंस्था)–राज्यात सुरू असलेला पाऊस थांबल्यानंतर शेतीच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत दिली जाईल, असे आश्वासन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहे. जून आणि जुलै महिन्यातील नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली असल्याचे कृषिमंत्र्यांनी सांगितले. उर्वरित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनाही लवकरच मदत दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात शिवारफेरीच्या उद्घाटनावेळी ते पत्रकारांशी बोलत होते.गेल्या काही दिवसांपासून राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषत: सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतातील उभी पिके डोळ्यासमोर नष्ट झाल्याने बळीराजा हतबल झाला आहे. कर्जमाफी आणि भरपाईच्या मागणीवरून विरोधक आक्रमक झाले असून, सरकारवर दबाव वाढला आहे.**



कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, राज्यात जून-जुलै महिन्यात झालेल्या शेतीच्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाई जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. नुकसानीचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हायला सुरुवात झाली आहे. पंचनाम्यानंतर उर्वरित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देखील लवकरच मदत मिळणार आहे.राज्यात सध्या युरियाचा तुटवडा जाणवत आहे. यासंदर्भात केंद्र सरकारसोबत चर्चा सुरू असून, लवकरच शेतकऱ्यांसाठी चांगली बातमी दिली जाईल, असे आश्वासनही कृषिमंत्र्यांनी दिले.दरम्यान, राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतील रिक्त पदांबाबत पुढील दोन महिन्यांत ठोस निर्णय घेतला जाईल, असे भरणे यांनी सांगितले. अकोला विद्यापीठातील रिक्त पदांवरून विद्यापीठ प्रशासन आणि सरकार यांच्यात निर्माण झालेल्या मतभेदांची दखल घेत सरकार निर्णय घेणार असल्याचे त्यांनी नमूद केलेअकोला कृषी विद्यापीठाची ४३ वी शिवारफेरी सुरू झाली असून, शिवारफेरीत हे ४३ वे वर्ष साजरे केले जात आहे. तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात २० एकर क्षेत्रावर ११२ खरीप पिके, २७ भाजीपाला पिके, ५९ फुल वर्गीय पिकांसह एकूण २१२ पिकांचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना पाहता येणार आहे. यासाठी विदर्भातील अकराही जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# मंगळवारी रिपाइंचे बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर महा धरणे आंदोलन

**केज । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (A)चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले साहेब यांच्या आदेशाने युवा रिपाइंचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष आणि बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक २३ सप्टेंबर रोजी गायरान धारकांच्या न्याय व हक्कासाठी भव्य महाधरणे आंदोलन आयोजित केले आहे.या धरणे आंदोलनात,सन १९९० च्या शासन परिपत्रका नुसार गायरानधारकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत.भूमिहिन गायरान धारक, शेतमजुर व ऊसतोड कामगार यांना प्रतिमाह रु.३ हजार पेन्शन (मानधन)लागु करण्यात यावे.गायरान धारकांच्या ७/१२ व ८-अ उतारा क्षेत्रावर असणारे पोट खराब क्षेत्र काढण्यात यावे.या मागण्याचा समावेश आहे.पप्पू कागदे यांच्या




खांद्याला खांदा लावून आंदोलन यशस्वी करण्यासाठी केज तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांच्या सोबत जिल्हा संघटक रविंद्र जोगदंड,तालुका सरचिटणीस गौतम बचुटे,ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे,आय टी सेल तालुका प्रमुख सुरज काळे,तालुका उपाध्यक्ष प्रशांत हजारे,येवता सर्कल प्रमुख हरिश गायकवाड,विनोद गायकवाड,रोहित कांबळे,प्रदिप शिनगारे, किशोर गरूड,नवनाथ खाडे,दिलीप खाडे, सरवदे,महिला आघाडी येवता सर्कल प्रमुख सरस्वती शिनगारे, भगवान कांबळे,रवी गायसमुद्रे, अन्वर शेख, वैभव जाधव,आदर्श जाधव यांनी केज तालुक्यातील गाव न गाव पिंजून काढून गायरानधारक आणि ऊसतोड मजूर यांनी मोठ्या संख्येने महाधरणे आंदोलनात सहभागी होण्यासाठी कानडीमाळी येथे येवता सर्कल नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी संवाद साधताना नागरिकांनी विविध समस्या आणि अडी अडचणी सोडविण्या साठी कार्यकर्त्यांनी मदत करण्याची देखील अपेक्षा व्यक्त केली आहे.

# औसा काँग्रेसची निवडणूक तयारी गतीमान कार्यकर्त्यांचा उत्साह,विजयाचा आत्मविश्वास
## संवाद व आढावा बैठकीत एकजुटीचा संकल्प,अभयदादा साळुंके यांचा आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीत विजयाचा दावा

**लातुर । नदीमउल्ला पटेल**

औसा शहर व विधानसभा क्षेत्रातील काँग्रेस पक्षाने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक २०२५ साठी तयारीला सुरुवात केली आहे. या अनुषंगाने काल २०/०९/ औसा येथे आयोजित संवाद व आढावा बैठकीत कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने सहभाग झाला.बैठकीत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली, औसाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी झालेल्या सत्कार समारंभामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभयदादा साळुंके यांनी आपल्या भाषणात, कार्यकर्त्यांच्या या उत्साहावरून निश्चितच



येणारी निवडणूक आपण जिंकू, असा विश्वास व्यक्त केला. तसेच प्रत्येक कार्यकर्त्याने घराघरात जाऊन पक्षाच्या धोरणांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी, असेही ते म्हणाले. बैठकीदरम्यान पक्षातील अन्य मान्यवरांनीही कार्यकर्त्यांचे कौतुक केले आणि आगामी निवडणुकीसाठी तयारी अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमामुळे औसा काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, स्थानिक स्वराज्य निवडणुकीत विजय मिळवण्याचा निर्धार पुन्हा एकदा दृढ झाला आहे.

# परळीत हजारोच्या संख्येने मुस्लिम समाज रस्त्यावर
## I LOVE MOHAMMED फलक लावणे गुन्हा आहे का?

**परळी । प्रतिनिधी**

परळीत सकल मुस्लिम समाज परळीच्या वतीने आज दिनांक १९ सप्टेंबर २०२५ शुक्रवारी संध्याकाळी आठ वाजेच्या सुमारास पैदल मार्चच्या आयोजन शहरातील शाहीन बाग पोलीस स्टेशन समोर नेहरू चौक तळ येथून राणी लक्ष्मीबाई टावर चौक ते कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात करण्यात आला होता,

इस्लाम धर्माचे शेवटचे पैगंबर मोहम्मद स.अ यांच्या जयंतीनिमित्त रावतपुर जिल्हा कानपुर उत्तर प्रदेश येथे तरुणांनी I LOVE MOHAMMED नावाचं फलक लावण्यात आलं होतं, ते लावल्यामुळे त्यांच्यावर पोलिस प्रशासनी १५



तरुणांवर कारवाई केली आहे. त्या घटनेच्या निषेधार्थ भारतातील प्रत्येक शहरांमध्ये I LOVE MOHAMMED च्या ट्रेन सोशल मीडियावर आणि शहरातील चौक चौकात लावतात आलं आहे. या घटनेच्या निषेधार्थ आज परळी पैदल मार्च आयोजन करण्यात आला होता.

# नंदुरबार येथील हत्येच्या निषेधार्थ तळोदा आणि अक्कलकुवा कडकडीत बंद;गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार शहरात किरकोळ वादातून झालेल्या एका तरुणाच्या हत्येच्या निषेधार्थ आज तळोदा आणि अक्कलकुवा तालुक्यांमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. जयेश रामू भिल या तरुणाच्या हत्येमुळे आदिवासी समाजात आणि इतर नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.जय आदिवासी ब्रिगेड आणि इतर सामाजिक संघटनांनी दिलेल्या हाकेला प्रतिसाद देत तळोदा शहरातील सर्व व्यापारी, कामगार आणि स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे बंद पाळला. शहरातील सर्व दुकाने, बाजारपेठा, आणि खासगी वाहतूक पूर्णपणे बंद होती. फक्त वैद्यकीय सेवांसारख्या अत्यावश्यक



बाबी सुरू होत्या. बंदमुळे शहरात अघोषित संचारबंदीसारखे वातावरण निर्माण झाले होते आणि रस्त्यांवर शुकशुकाट होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

दुरबारच्या घटनेचे पडसाद अक्कलकुवा तालुक्यातही उमटले. जिल्ह्यातील आदिवासी संघटनांनी पुकारलेल्या या बंदला नागरिकांनी आणि व्यावसायिकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला. अक्कलकुवा, वाण्याविहीर, कोराई, खापर, मोलगी यांसारख्या प्रमुख बाजारपेठांमध्ये पूर्णपणे व्यवहार ठप्प होते. अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने बंद ठेवण्यात आली होती. या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत, नागरिकांनी प्रशासनाला गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. तालुक्यात शांततेत बंद पाळण्यात आला.या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तणावपूर्ण शांतता असून, आदिवासी समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते आणि तरुणांनी एकत्र येत आपल्या मागण्या प्रशासनासमोर मांडल्या आहेत. दोन्ही तालुक्यांतील जनतेने शांतता राखून आपला निषेध व्यक्त केल्याने पोलिसांच्या बंदोबस्ताची अधिक गरज भासली नाही.

# जय वळवी यांच्या हत्येच्या निषेधार्थ बोरदमध्ये कडकडीत बंद; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बोरद । मंगेश पाटील**

नंदुरबार येथील जय वळवी यांच्या दुर्दैवी हत्येच्या निषेधार्थ बोरद येथे आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाने पुकारलेला बंद २० सप्टेंबर रोजी पूर्णपणे यशस्वी झाला. कोणताही अनुचित प्रकार न घडता हा बंद शांततेत पार पडला.

जय वळवी यांच्यावर हल्ला करणाऱ्या संशयित आरोपी सूर्यकांत सुधाकर मराठे आणि चेतन चौधरी यांच्यावर कठोर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी करत हा बंद पुकारण्यात आला होता. बोरद गावातील जनतेने आणि व्यापाऱ्यांनी या मागणीला पाठिंबा देत बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बंदच्या आदल्याच दिवशी मुख्य बाजारपेठेत बंदचे आवाहन करणारे फलक लावण्यात आले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत गावातील सर्व दुकाने आणि व्यापारी प्रतिष्ठाने दिवसभर बंद ठेवण्यात आली होती. दूध, मेडिकल, दवाखाने आणि भाजीपाला यांसारख्या अत्यावश्यक सेवा वगळता सर्व व्यवहार पूर्णपणे थांबले होते.

ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागामुळे हा बंद शांततेत आणि यशस्वीपणे पार पडला. गावात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संध्याकाळी जय वळवी यांना न्याय मिळावा या मागणीसाठी बिरसा मुंडा चौकापासून मुख्य बाजारपेठेपर्यंत कँडल मार्च काढण्यात आला. या मार्चमध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते. समस्त आदिवासी समुदायाने या बंद आणि कँडल मार्चमध्ये एकजूट दाखवली.



संपादकीय

# कोकणावर पावसाचे दुष्काळी सावट



कोकणात ढगफुटी केव्हा कोणत्या भागात होईल याचा अंदाज बांधणेही शेतकऱ्याला अवघड झाले आहे. पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भातशेती पाण्याखाली गेली आहे. कोकणातील खाडीकिनारी गावातून खाजणात केली जाणारी भातशेती पाण्याखालीच आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टी झाली. राज्यातील अनेक भागांत शेतीचे नुकसान झाले आहे. 'आई जेवू घालेना, बाप भीक मागू देईना' अशी अवस्था कोकणासह राज्यातील शेतकऱ्यांची झालेली आहे. माध्यमांवर दाखवली जाणारी छायाचित्रे, व्हीडिओ केवळ शेतकऱ्यालाच नाही, तर पाहणाऱ्या कुणाचेही मन हेलावणारे असतात; परंतु यात कोकणातील नुकसानीचे चित्र कधी माध्यमांवर दिसत नाहीत. भातशेती, फळबागायतीच नुकसान झालेलं असलं तरीही आलेल्या परिस्थितीला, प्रसंगाला सामोरे जाण्याची तयारी कोकणातील शेतकऱ्यांची असते.संपूर्ण महाराष्ट्रात पाऊसधारा बरसत आहेत. पाऊस थांबता थांबेना अशी स्थिती यावर्षी कोकणात आहे. उत्साहाने साजरा करणाऱ्या गणेशोत्सवातही मुसळधार पाऊस पडत होता. कोकणवासीय कोणताही उत्सव साजरा करताना कधीच खिशात पैसे नाहीत किंवा आणखी काही होतय म्हणून कधीच डोक्याला हात लावून बसत नाहीत, अरे काय हा त्या 'देवाक काळजी' हा परवलीचा शब्द कोकणवासीयाच्या संवादात सहज सापडतो. त्यामुळे बाहेर पाऊस पडत असतानाही गणपतीचा उत्सव पूर्वीच्याच दिमाखात, उत्साहात कोकणवासीयांनी साजरा केला.गणेशोत्सवानंतर पाऊस थांबेल या अपेक्षेत कोकणातील शेतकरी होता; परंतु तसं काही घडलं नाही. पाऊस नुसता हजेरी लावत नाही, तर तो दिवसभर कोसळत असतो. ढगफुटी केव्हा कोणत्या भागात होईल याचा अंदाज बांधणेही शेतकऱ्याला अवघड झाले आहे. कोकणातील पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भातशेती पाण्याखाली गेली आहे. कोकणातील खाडीकिनारी गावातून खाजणात केली जाणारी भातशेती पाण्याखाली गेली आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टी झाली.राज्यातील अनेक भागांतील शेतीचे नुकसान झाले आहे. 'आई जेवू घालेना, बाप भीक मागू देईना' अशी अवस्था कोकणासह राज्यातील शेतकऱ्यांची झालेली आहे. माध्यमांवर दाखवली जाणारी छायाचित्रे, व्हीडिओ केवळ शेतकऱ्यालाच नाही, तर पाहणाऱ्या कुणाचही मन हेलावणारे असतात; परंतु यात कोकणातील नुकसानीचे चित्र कधी माध्यमांवर दिसत नाही. कोकणातील शेतकरी कधीही भातशेती, फळबागायतीच नुकसान झालेलं असलं तरीही आलेल्या परिस्थितीला, प्रसंगाला सामोरे जाण्याची तयारी कोकणातील शेतकऱ्यांची असते. कर्जबाजारीपणा कोकणातील शेतकऱ्यालाही चुकलेला नाही; परंतु कोकणातील शेतकरी आपणाला कर्जाचे किती पैसे भरता येईल तितकच कर्ज घेणारा आणि बँकाचे कर्ज वेळच्या-वेळी परतफेड करण्याची मानसिकता असलेला कोकणातील सर्वसामान्य शेतकरी आहे. यामुळेच महाराष्ट्र सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार आहे काय ? याची वाट न पाहता काम करत राहणारा शेतकरी आहे. पूर्वी कोकणातील शेतकरी कष्टाळू नाही आळशी आहे. असं उर्वरित महाराष्ट्रातील राजकीय नेते भाषण द्यायचे; परंतु कोकणातील शेतकरी कष्टाळूही आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोकणातील शेतकरी 'समाधानी' वृत्तीचा आहे.कदाचित यामुळे त्याच नुकसानही होत असलं तरीही मृगजळाच्या इथला शेतकरी पाठलाग करत बसत नाही. नियोजनरीत्या फळबागायत किंवा शेती केली जाते. अलीकडे अनेक तरुण गावात शेती, फळबागायती करताना दिसतात. मात्र, निसर्गाच्या बेभरवशामुळे कोकणातील शेतकरी नाराज आहे. एकीकडे निसर्गाचा बेभरवसा, तर दुसरीकडे वन्यप्राण्यांचा शेतात वाढत चाललेला मुक्तसंचार यात वन्य प्राण्यांचा गावो-गावी जो मुक्तसंचार वाढला आहे तो केवळ शेतकऱ्यांसाठीच नव्हे, तर सर्वांसाठीच चिंतेचा विषय आहे. भातशेती पाण्याखाली गेली आहे. भातशेती खरे तर यावर्षी चांगलं पीक येईल असे अंदाज कोकणातील शेतकरी आखून होता. कोकणात भातशेतीचं प्रमाण फारच कमी झालं आहे. पालघर, रायगड या जिल्ह्यातून आजही भातशेती केली जात आहे; परंतु सिंधुदुर्ग जिल्ह्यात भातशेती करण्याचे प्रमाण कमी आहे. अर्थात त्याची अनेक कारणे आहेत. शेतीत राबण्यासाठी मजूर मिळत नाही. कुटुंबात गावात राहणाऱ्यांची संख्या नगण्य आहे.या सगळ्याचा परिणाम कोकणातील भातशेती करण्यावर झालेला आहे. यावर्षी कोकणातील अनेक शेतकरी सांगतात महिन्याभरापूर्वी भातशेती चांगली झालेली; परंतु गेल्या पंधरवड्यात जो पाऊस पडतोय त्यामुळे भातशेतीच काय होणार हे कोणाला काहीच सांगता येणारे नाही. महाराष्ट्रातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये जो पाऊस झाला आहे त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी शेतकरी मागणी करत असले तरीही शेतकऱ्यांचे झालेले नुकसान आणि शेतकऱ्यांना राज्यसरकारकडून मिळणारं अनुदान, मदतही तुटपुंजीच राहते. कोकणातही महाराष्ट्राला इतर भागाप्रमाणेच भातशेती बागायतीचे नुकसान झाले आहे. फक्त कोकणातील शेतकरी, बागायतदार रडताना कधीच टीव्ही चॅनेलवर दिसत नाही. ही बाब तितकीचमहत्त्वाची आहे. ज्यांना बांबू लागवडीचं महत्त्व समजले त्यांनी प्रयत्नही चालविले आहेत. काही शेतकऱ्यांनी बांबू लागवड करणे किती किफायतशीर आहे हे देखील दाखवून दिले आहे. बांबूची एकदा लागवड केली की वारंवार त्यात लक्ष घालण्याची आवश्यकता नाही. जशी उसाची लागवड तशीच बांबू लागवड आहे. इतर पिकांच्या बाबतीत जशी मेहनत घ्यावी लागते तशी मेहनत बांबू लागवडीमध्ये नाही. इतर पिकांना हवामानाचा फटका बसतो; परंतु बांबूला हवामानाचा फटका बसत नाही. त्यामुळे बांबू लागवडीकडे कोकणातील शेतकऱ्यांनी अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. राज्यसरकारनेही राज्यात बांबूमिशन राबविण्याचा निर्णय घेतला आहे.शेतकऱ्यांसाठी क्रांती घडवणारा बांबू उद्योग हा महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो. आजवर कोकणातील सर्व जिल्ह्यांमध्ये शेताच्या बांधावर वडिलोपार्जित बांबू लागवड झालेली आहे. बांबू लागवडीच्याबाबतीत पूर्वी फार कोणी लक्ष घातले नव्हते; परंतु गेल्या काही वर्षांत बांबू लागवड आणि बांबू उद्योगावर फार चर्चाही होऊ लागली आहे. आजही शेतकऱ्यांना बांबू लागवडीत फार स्वारस्य नाही; परंतु त्याचं एक प्रमुख कारण म्हणजे वन्यप्राण्यांपासून होणारा उपद्रव बांबू लागवडीला आणि बांबूला आलेल्या व्यावसायिक महत्त्व आजही फार लोकांना माहीत झालेलं नाही. त्यामुळे पडीक डोंगराळ माळरान असतानाही बांबू लागवडीचे प्रयत्न होताना दिसत नाहीत.

# अक्कलकुवा तालुक्यातील अक्कलकुवा शहरासह वाण्याविहीर खापर मोलगी येथे कडकडीत बंद

## सर्व व्यापारी प्रतिष्ठाने बंद तर अत्यावश्यक सेवा सुरू

**मोलगी । रवींद्र वळवी**

नंदुरबार सिंधी कॉलनी येथे युवकाची हत्या करणाऱ्याला फाशीची शिक्षा करण्यात यावी;यासाठी बिरसा आर्मी व आदिवासी बांधवांकडून पोलीस निरीक्षक अक्कलकुवा येथील पोलीस स्टेशन व तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले होते.

दि.१६ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ७.१५ चा सुमारास जयेश वळवी या तरुणावर चौकूने प्राणघातक हल्ला केल्याने त्यांचा सुरत येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाला.आरोपी सूर्यकांत सुधाकर मराठे यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी.आरोपी गाडीच्या डिक्कीतुन चाकू काढून प्राणघातक हल्ला करतो तरी हल्लेखोरा सोबत आलेला सहआरोपी पोलीस कर्मचारी चेतन चौधरी हल्ला होत असतांना बघ्याची भूमिका घेत असल्याने पोलीस प्रशासनावर ही संशय निर्माण होत आहे.हत्येचा कट हा पूर्वनियोजित असल्याचे दिसून येत आहे.या हत्येची स्वतंत्र एसआयटी मार्फत चौकशी होऊन मास्टर माईंड कोण व इतर साथीदारांना ही अटक करण्याची मागणी केली जात . या घटनेचा निषेध म्हणून आज अक्कलकुवा शहर ,खापर , वाण्याविहीर, मोलगी येथील पूर्णपणे व्यवहार बंद करून कडकडीत बंद पाळण्यात आला .अत्यावश्यक सेवा वगळता सर्व व्यापारी बांधव व शहरवासियांनी सहकार्य केले आहे. व ठिकठिकाणी आदिवासी बांधवांकडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



# धडगाव तालुक्यातील सरपंचाचे २४ तासांत यशस्वी अपहरण

## सुटका पोलीस प्रशासनाच्या तत्परतेमुळे शक्य

**मोलगी । रवींद्र वळवी**

धडगाव तालुक्यातील सावऱ्यादिगर गावाचे सरपंच यांचे धक्कादायक अपहरण झाल्याची घटना घडली. मात्र, पोलीस प्रशासनाच्या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे अवघ्या २४ तासांत सरपंचाची सुटका करण्यात यश आले. या घटनेने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडवून दिली होती.

सरपंचाचे अपहरण सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील येडेनिपाणी येथील ऊसतोड ठेकेदार पोपट दिलीप शेवाळे, त्याचे दोन भाऊ, दोन साथीदार आणि दोन स्थानिक लोकांच्या मदतीने करण्यात आले. त्यांनी सिनेस्टाईलप्रमाणे सरपंचांना फसवून गाडीत बसवले आणि मारहाण करत त्यांचे हात बांधून त्यांना घेऊन गेले. या घटनेमुळे सरपंचांचे कुटुंब, गावकरी आणि सरपंच परिषद धडगाव यांच्यात तीव्र संताप निर्माण झाला होता. त्यांनी पोलिसांवर तातडीने कारवाईसाठी दबाव आणला आणि २४ तासांत सुटका न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला.



या गंभीर घटनेची दखल घेत नंदुरबार जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी मिताली सेठी, माजी खासदार डॉ. हिना गावित आणि जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. धडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक राहुल पाटील, हवालदार राकेश गिरासे यांच्यासह सुभाष पावरा (भाजप), अर्जुन पावरा, राकेश पावरा, रामा पावरा, फतन भंडारी, बुगा पावरा आणि लोकेश पावरा या टीमने सांगली येथे जाऊन सरपंचांची अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सुखरूप सुटका केली. स्थानिक कुरळप पोलीस ठाण्यानेही या मोहिमेत मोलाची मदत केली.सरपंचांच्या सुटकेनंतर गावात आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण पसरले. सरपंचांची वृद्ध आई-वडील, पत्नी आणि लहान मुलीने त्यांना घट्ट मिठी मारून अश्रूंना वाट मोकळी करून दिली. हे दृश्य पाहून उपस्थित गावकरीही भावूक झाले होते. पोलिसांनी दाखवलेल्या या तत्परतेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या घटनेनंतर पोलिसांनी अशा घटना टाळण्यासाठी अधिक दक्ष राहावे, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# जागतिक बांबू दिवस: बांबू लागवडीतून समृद्धीचा नवा मार्ग

**मोलगी । रवींद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यातील बालाघाट गावात जागतिक बांबू दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात बांबू लागवडीतून शेतकऱ्यांचे जीवनमान आणि आर्थिक स्थिती कशी सुधारू शकते, यावर मार्गदर्शन करण्यात आले. रीड्स भारत, महाराष्ट्र बांबू प्रमोशन फाउंडेशन आणि स्थानिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी रविंद्र मोरे (डी.डी.एम. नाबार्ड नंदुरबार) यांनी बांबूच्या आर्थिक महत्त्वावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, बांबू हे केवळ उत्पन्नाचे साधन नसून, उपजीविकेचा एक स्थिर आणि शाश्वत स्रोत आहे. त्यांनी शेतकऱ्यांना नवीन बांबू लागवडीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. तसेच, बांबूपासून गृहउपयोगी आणि सजावटी वस्तू बनवण्याचे प्रशिक्षण घेऊन रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करता येतील, असेही त्यांनी सांगितले.

स्थानिक बांबू कारागीर वंजारी वळवी यांनी आपला अनुभव सांगताना, बांबूच्या कामामुळे त्यांच्या जीवनात आणि आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल झाल्याचे सांगितले. वनविभाग अधिकारी मनोज पवार यांनी बांबू लागवड आणि संवर्धनाबद्दल तांत्रिक माहिती दिली.

रीड्स नंदुरबारचे किरण गोरे यांनी बांबू मित्रांच्या सहकार्याने उत्पादन वाढवणे आणि शाश्वत विकास साधणे कसे शक्य आहे, हे समजावून सांगितले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश बांबू लागवडीस प्रोत्साहन देणे, त्याचे व्यावसायिक मूल्य वाढवणे आणि ग्रामीण भागासाठी रोजगार निर्मिती करणे हा होता.



# तळोदा तालुका खरेदी-विक्री संघाची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

**बोरद । मंगेश पाटील**

तळोदा तालुका खरेदी-विक्री संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा आमलाड येथील कनकेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संघाचे चेअरमन गोविंद पुरुषोत्तम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत मागील वर्षाचा आर्थिक अहवाल आणि नफा वाटणीचे ठराव मंजूर करण्यात आले.

या सभेत संघाचे मॅनेजर योगेश चौधरी यांनी मागील सभेचे प्रोसिडिंग बुक, वार्षिक अहवाल आणि आर्थिक पत्रके सादर केली. गेल्या आर्थिक वर्षात संघाने ३.५ कोटी रुपयांची उलाढाल करून १ लाख ६५ हजार रुपयांचा नफा कमावला असल्याची माहिती त्यांनी दिली. या नफ्याची वाटणी सर्व सभासदांच्या संमतीने करण्यात आली. संघाचे व्हाईस चेअरमन पुरुषोत्तम रामदास चव्हाण यांनी संस्थेचे भाग भांडवल वाढवण्यासाठी




सदस्यांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच, संचालक गुलाबसिंग गिरासे यांनी सहकार क्षेत्र मजबूत करण्यासाठी सर्व सभासदांनी खते आणि कीटकनाशके संघाकडूनच खरेदी करावीत, असे सांगितले.

यावेळी, ९२ वर्षांचे ज्येष्ठ सभासद चुनीलाल माळी, कीर्तीकुमार शहा, रमेश चौधरी यांच्यासह महिला सभासदांचा सन्मान करण्यात आला. महाधन कंपनीचे कृषी तज्ज्ञ विशाल भोर आणि अक्षय खरात यांनी शेतकऱ्यांना रासायनिक आणि सेंद्रिय खतांच्या वापराबाबत तसेच पिकांवर येणाऱ्या रोगांवर उपाययोजना कशी करावी, याबद्दल मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात चेअरमन गोविंद पाटील यांनी सांगितले की, संघाला मिळालेला नफा हा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळेच शक्य झाला आहे. नफा टिकवण्यासाठी कर्मचाऱ्यांनी आपले पगार कमी केले आणि पदाधिकाऱ्यांनी मानधन न घेता काम केले. त्यांनी सर्व सदस्यांना सहकारी खरेदी-विक्री संघातूनच कृषी साहित्य खरेदी करण्याचे आवाहन केले.

या सभेला चेअरमन गोविंद पाटील, व्हाईस चेअरमन पुरुषोत्तम चव्हाण यांच्यासह सर्व संचालक मंडळ, अधिकारी आणि मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. शेवटी गुलाबसिंग गिरासे यांनी आभार मानले. ही वार्षिक सर्वसाधारण सभा यशस्वीपणे पार पडली.

# नंदुरबारमध्ये तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबिर

**नंदुरबार । दिपक गोसावी**

महसूल प्रशासनाचे काम अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख करण्यासाठी नंदुरबार जिल्हा तलाठी संघाच्या वतीने दिनांक २० रोजी एक दिवसीय प्रशिक्षण व चर्चासत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बिरसा मुंडा सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या या शिबिरामुळे प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या शिबिराचे उद्घाटन नंदुरबार जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या हस्ते झाले. आपल्या भाषणात त्यांनी तलाठी आणि मंडळ अधिकारी हे महसूल प्रशासनाचे महत्त्वाचे आधारस्तंभ असल्याचे सांगितले. शासनाचे निर्णय गावपातळीवर पोहोचवण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. त्यांच्या कामात पारदर्शकता, गती आणि नियमांचे पालन झाल्यास लोकांचा प्रशासनावरील विश्वास वाढेल, असे त्या म्हणाल्या.या शिबिरात सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी डॉ. संजय कुंडेटकर यांनी



तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी जवळपास आठ तास विविध विषयांवर चर्चा केली. यामध्ये तलाठी दप्तर, गावनमुने, प्रॉपर्टीविषयी महसूली शब्दसंपदा, तसेच हक्क सोड पत्रक, बक्षीसपत्र आणि मृत्यूपत्राचे कायदेशीर पैलू यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच, जमीन महसूल नियमांतील बदल आणि प्रत्यक्ष कामातील अडचणी यावरही चर्चा करण्यात आली.या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. या शिबिरातून मिळालेल्या माहितीमुळे भविष्यात आपले काम अधिक प्रभावी होईल, चुका टळतील आणि प्रशासन अधिक पारदर्शक बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या शिबिराचे यशस्वी आयोजन नंदुरबार जिल्हा तलाठी संघाने केले. संघाचे मार्गदर्शक शिरीष परदेशी, मदन कावळे आणि गणेश कानडे यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन जितेंद्र नांद्रे यांनी केले, तर आभारप्रदर्शन लक्ष्मण कोळी यांनी केले.

# समाजाचा कणा बळकट करणारे उद्योजक व्हा-मा.ना.चंद्रकांत दादा पाटील

**नांदेड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाकडून स्टार्टअप इंडिया, मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया अशा विविध योजनाद्वारे नव्या पिढीला साठी संधीची द्वारे उघडली आहेत. त्यातून नवीन प्रयोग, नवीन वाटचाली घडविण्याची ताकद तुमच्यामध्ये आहे. उद्योजकतेला आणि करिअरला मूल्यांची आणि समाजसेवेची जोड द्या. तुमच्या प्रत्येक कृतीत प्रमाणिकपणा, जबाबदारी आणि पर्यावरणाबद्दलची आस्था असावी, असा मूलमंत्र महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. ना. चंद्रकांत दादा पाटील यांनी विद्यापीठाच्या २८ व्या दीक्षांत समारंभास उपस्थित विद्यार्थ्यांना दिला.

विद्यापीठाच्या दीक्षान्त मंचावर संपन्न झालेल्या या समारोहाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर हे होते. त्यांच्या समवेत प्रमुख पाहुणे म्हणून अवंतिका विद्यापीठ उज्जैनचे कुलपती तथा आय.आय.टी., कानपुरचे माजी संचालक पद्मश्री डॉ. संजय गोविंद धांडे, विद्यापीठाचे प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, व्यवस्थापन परिषदचे सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, डॉ. संगीता माकोने, डॉ. संतराम मुंढे, नरेंद्र चव्हाण, नारायण चौधरी, हनमंत कंधारकर, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. सुरेखा भोसले, सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, वित्त व लेखाधिकारी डॉ.पराग भालचंद्र, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. डी. एम. खंदारे, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर यांची उपस्थिती होती.पुढे ते म्हणाले, आज गुरुगोविंद सिंगजी यांच्या समाधी चरणी मराठवाडा सुजलाम, सुफलाम होऊ दे, येथे शिक्षणाचे प्रमाण वाढू, रोजगार वाढू दे अशी प्रार्थना केली. विद्यापीठांनी सध्या एनआयआरएफ मधील रँकिंग कडे लक्ष देण्याची गरज आहे. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ यामध्ये कुठेही कमी पडणार नाही, अशी अपेक्षाही यावेळी त्यांनी व्यक्त केली.याप्रसंगी अवंतिका विद्यापीठ, उज्जैनचे कुलपती तथा आयआयटी कानपूरचे माजी संचालक पद्मश्री डॉ. संजय धांडे विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले, तुम्ही आता आयुष्यभर शिकण्याच्या नवीन विद्यापीठात, प्रवेश करत आहात. या विद्यापीठात परीक्षा नाहीत, गुण नाहीत, प्रमाणपत्रे नाहीत, व्याख्याने नाहीत आणि प्रयोगशाळाही नाहीत. मात्र या विद्यापीठातील प्रत्येक विद्यार्थी अनुभवातून शिकत असतो. खरे जग हे गतिशील प्रणाली आहे. ते सतत बदलत असते. कोविडनंतर या बदलांचा




वेग अधिक वाढला आहे. या बदलत्या परिस्थितीत काही कौशल्य कालबाह्य होतात, तर काही नवीन कौशल्यांची निर्मिती होते आणि ह्याच कौशल्यांची मागणी असते. स्वतः नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची क्षमता ही आजच्या जगातली खरी आवश्यकता आहे. या संदर्भात मला एकलव्याची कथा फार महत्त्वाची वाटते. त्यांनी धनुर्विद्या स्वतः शिकली आणि आत्मसात केली. गुरुदक्षिणा म्हणून त्याने आपला अंगठा अर्पण केला आणि त्यानंतर आपल्या पायांच्या साहाय्याने धनुर्विद्या अवगत केली. त्यामुळे आजच्या काळात आपल्याला अनेक असे एकलव्य घडवावेत लागतील. अशा व्यक्तीला आपण डिजिटल एकलव्य म्हणू शकतो.

यावेळी दीक्षान्त समारोहाचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यापीठाच्या वैशिष्ठेपूर्ण उपक्रमासह विद्यापीठाच्या महत्त्वपूर्ण बाबींचा अहवाल सादर केला.याप्रसंगी विद्यापीठातून विविध विषयामध्ये सर्वाधिक गुण घेणारे सयदा तयबा, सागर गोरगिळे, तनिषा चव्हाण, रत्नशील सोनकांबळे, प्रसाद बोडखे, जहीर काझी, नाजिया शेख, वैष्णवी साकोळे, गायत्री चव्हाण, अंजुम बानू, सना गाडीवान, पद्मश्री मुसळे, अवंतिका पवार, अकिब अहेमद, अंजली बिरादार, आरती रोडगे, ऐश्वर्या नादे, हुडा दुरानी, बलजींदरकौर कांचवाले, गोविंद टीथे, कोमल धुमार, मनदीप तुलसाणी, गीता गुणाळे, सरस्वती लंगुटे, जीगिशा देशपांडे, सिंधुताई पाटील, नेहा कुरील, प्रतिभा जाधव, ऐश्वर्या कुलकर्णी, व्यंकट पांचाळ, कल्पना गाजरे, सुषमा पाटील, संयुक्ता कोचुरे, गायत्री सोळंकी, काजल वाघमारे, दीपिका यादव, विजया कांबळे, प्रतिमा मजगे, कैलास आघाव आणि नरसिंग बुगडे या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सुवर्णपदक देवून सन्मानित करण्यात येणार आहे. दुपारच्या सत्रामध्ये मान्यवराच्या हस्ते विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. विठ्ठल यांनी केले. ज्ञानदंडासह दीक्षांत मिरवणुकीने कार्यक्रमाची सुरुवात झाली, त्यांनतर राष्ट्रगीत, राज्यगीत आणि विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. तर राष्ट्रगीताने दीक्षांत समारोहाचे सांगता झाली. यावेळी विद्यापरिषद सदस्य, अधिसभा सदस्य यांच्यासह प्राधिकरण, विविध समीतीचे सदस्य, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नंदुरबारचा सुपुत्र प्रणव गावितचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव

## जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांच्या हस्ते सत्कार

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार शहराच्या एस. ए. मिशन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात २० सप्टेंबर २०२५ रोजी एका प्रेरणादायी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. चीनमधील होहहॉट येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय रग्बी स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून परतलेल्या नंदुरबारचे सुपुत्र प्रणव गावित याचा गौरवशाली सत्कार जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी उपशिक्षणाधिकारी निलेश लोहकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रणव गावितने आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळवलेले यश हे जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे, असे सांगत जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांनी त्याचे अभिनंदन केले. त्या म्हणाल्या, कमी साधनांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणे अत्यंत कठीण आहे, मात्र प्रणवची जिद्द आणि मेहनत ही इतर खेळाडूंसाठी प्रेरणादायी आहे. जिल्ह्यात खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी लवकरच 'स्पोर्ट्स सपोर्ट टीम' स्थापन केली



जाईल आणि तिचे नेतृत्व प्रणव गावितकडे सोपवण्यात येईल. याशिवाय प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्याचे नियोजन आहे.

या सोहळ्यादरम्यान जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांनी प्रणव गावित आणि त्याचे प्रशिक्षक खुशाल शर्मा यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. हा कार्यक्रम केवळ एका खेळाडूचा गौरव नसून नंदुरबार जिल्ह्यातील तरुणाईला नवीन स्वप्ने पाहण्यासाठी आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रेरणा देणारा ठरला. यातून जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला नवीन दिशा मिळेल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

# पोलीस अधीक्षक कार्यालयावर सकल मातंग समाजाचा मोर्चा

## हल्लेखोर सराईत गुंडांना तात्काळ अटक करून कठोर कारवाईची मागणी



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

श्रीरामपूर शहरात घडलेल्या भीषण घटनेच्या निषेधार्थ सकल मातंग समाजाच्या वतीने मोठ्या संख्येने समाजबांधवांनी पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले आहे की, मातंग समाजातील निष्पाप युवक साई साळवे, रुद्र जगधने व भोलू गुप्ता यांच्यावर मुस्लिम समाजातील सराईत गुंड साहिल सय्यद व शाहिद सय्यद यांनी धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात तिघेही युवक रक्ताच्या थारोळ्यात गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडले. त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.

यापूर्वीही या सराईत गुंडांविरोधात पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती, मात्र श्रीरामपूर पोलिसांनी कोणतीही ठोस कारवाई केली नाही. त्यामुळेच या आरोपींचा धीर वाढून त्यांनी मोठा गुन्हा केला असल्याचा आरोप निवेदनात व्यकत करण्यात आला आहे.आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी या मोर्चातून करण्यात आली.या मोर्चात अंकुश मोहिते, सुनील उमाप, चंद्रकांत काळाखे,नामदेव चांदणे, संजय चांदणे ,जय भोसले, पप्पू पाटिल,राम वडागळे, राम काते पोपटराव पाथरे, प्रकाश वाघमारे, दिपक पाचारणे, लहु खंडागळे सनी लोखंडे सुनिल सकट आकाश भोसले, अशोक भोसले, यशोदास वाघमारे, सागर साठे, नितीन खंडारे, दीपक सरोदे, हिना उबाळे, विलास ससाने, सागर उबाळे, रोहित जोशी, स्वप्निल साळवे, सुनील ढोले, राहुल ठोकळ, यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# गरोदर माता व लहान बालकांची तपासणी करुन पोषण व आरोग्याविषयी मार्गदर्शन

## महिला स्वस्थ तर परिवार सशक्त-डॉ.अनिल ससाने



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

स्वास्थ्य नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत वाळकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात महिला आरोग्य तपासणी व सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग नोंदवला.हे शिबिर महाराष्ट्र राज्य व जिल्हा परिषद आरोग्य विभाग, प्राथमिक आरोग्य केंद्र वाळकी, युवक कल्याण योजना अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व समाज परिवर्तन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. शिबिरामध्ये महिलांची संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली. रक्त, लघवी, रक्तदाब तसेच स्त्रीरोग विषयक सर्व प्रकारच्या तपासण्या करण्यात आल्या.

स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. भास्कर रणनवरे यांनी महिलांचे आरोग्य तपासले आणि गरोदर माता व नवजात बालकांच्या आरोग्यविषयी मार्गदर्शन केले. डॉ. अनिल ससाने व डॉ. आशिष टाक यांनी तपासण्या करून आवश्यक उपचार दिले. वैद्यकीय कर्मचाऱ्यांमध्ये सिस्टर वैशाली धामणे, सिस्टर अंजली शिंदे व देविदास पवार , व सर्व स्टाफ यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

शिबिरात गरोदर मातांची व लहान बालकांची तपासणी करून त्यांना योग्य उपचार तसेच औषधे देण्यात आली. यासोबतच महिलांना पोषण आहाराचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

डॉ. अनिल ससाने म्हणाले की, कुटुंबातील महिला स्वस्थ असतील तर त्या संपूर्ण परिवाराची उत्तम काळजी घेऊ शकतात. म्हणूनच महिलांचे आरोग्य चांगले असणे हे समाजाच्या निरोगी आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. निरोगी मातांमुळे सशक्त परिवार घडणार असल्याचे ते म्हणाले.

# जिल्हाधिकारी जावळे यांच्या हस्ते माणगाव उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातभूप्रमाण केंद्राचे उदघाटन



**बोरघर । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री मा. श्री. नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या जन्म दिनी अर्थात १७ सप्टेंबर रोजी माणगाव उप अधीक्षक भूमी अभीलेख कार्यालय येथे नागरिकांच्या सोयीसाठी ऑनलाईन प्रक्रिया सुरू करून कामाचा निपटारा लवकर करण्यासाठी भूप्रमाण केंद्राचे '' उदघाटन करण्यात आले. या प्रसंगी रायगड जिल्हा परिषदेच्या सीईओ श्रीमती. नेहा भोसले , जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख . सुनील इंदलकर , उपविभागीय अधिकारी संदीपान सानप , तहसीलदार . दशरथ काळे , उपअधीक्षक भूमिअधिलेख माणगांव गणेश सोनार , व भूप्रमाण संचालक उमेश साटम , व त्यांच्या सहचारिणी सौ. स्मिता साटम, कर्मचारी सौ. सोनाली धामणे, सौ. हर्षदा सुतार, तसेच उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय माणगांव कर्मचारी रमेश राठोड निमितानदार, प्रदीप चव्हाण अभिलेखपाल, रंगनाथ पवार सर्वेअर, अमोल बरकडे सर्वेअर, किर्ती तांबवेकर छाननी लिपिक, करिष्मा मून प्रतिलिपी लिपिक, हर्षाली दामोदरे अकाऊंट लिपिक , श्री.भुवड दप्तरबंद, व तहसील कार्यालय माणगांव येथील कर्मचारी वर्ग, उपविभागीय अधिकारी माणगांव येथील कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे प्रसंगी बोलताना भूमी अभिलेख रायगड जिल्हा अधीक्षक. सुनील इंदूरकर साहेब म्हणाले की, या भूप्रमाण केंद्रा मधून सर्वसामान्य नागरिकांना इथून पुढे नेहमीच चांगला फायदा होईल.जनतेला ऑनलाईन अर्ज शासकीय दरात भरून मिळेल. व भूमी अभिलेख कार्यालय कामासाठी हेलपाटे मारण्याची आवश्यकता लागणार नाही. नागरिकांना कार्यालयातील भूप्रमाण केंद्रात बसून तत्काळ सेवा प्राप्त करून घेऊ शकतील. तसेच उपअधीक्षक भूमी अभिलेख यांनी जनतेला आव्हान केले आहे. कार्यालयात ९० दिवसांवर प्रलंबित प्रकरण ज्यांनी विनंती अर्ज दिले आहेत. त्यांना पुढील महिन्यात मोजणी तारखा देण्यात येणार आहेत. त्यांनी त्यांच्या शेतीची मोजणी करण्यास सहकार्य करण्याची अपेक्षा केली आहे. तसेच प्रलंबित कामाबाबत कार्यालय प्रमुख यांना भेटावे

# बदलापूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पडळकरविरोधात चप्पल मारो आंदोलन

**बदलापूर । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते जयंत पाटील यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य केले. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. अनेक ठिकाणी पडळकर यांच्या विरोधात आंदोलने करण्यात आली, आणि बदलापूर शहरातही त्यांचा निषेध करण्यात आला.

शनिवारी बदलापूरमध्ये शरद पवार यांच्या पक्षाच्या वतीने आयोजित आंदोलनात पडळकरांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले, तर जयंत पाटील यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अविनाश देशमुख यांनी थेट बँकिंग विधान करत सांगितले की, गोपीचंद पडळकर यांची जीभ कापणाऱ्यास पाच लाख रुपये बक्षीस दिले जाईल.अविनाश देशमुख



म्हणाले, सार्वजनिक जीवनात जबाबदारीने बोलणे हेच राजकारणातील संस्कारांचे मूळ आहे. दुर्दैवाने, आमदार गोपीचंद पडळकर यांनी अलीकडच्या कार्यक्रमात अर्वाच्य शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांच्यावर केलेली टीका अत्यंत दुर्दैवी व असंस्कृत आहे. मी या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध करतो आणि जीभ छाटणाऱ्याला पाच लाखाचे बक्षीस देईन.

बदलापूरमध्ये शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिकेत हा निषेध व्यक्त केला असून, हा प्रकार पक्षाच्या तक्रारींच्या निमित्ताने जोरदार आंदोलनात रूपांतरित झाला आहे.

# भाजपा जिल्हा अध्यक्ष संजय गाते यांना राष्ट्रीय अटल अलंकार पुरस्कार

**पुलगाव । प्रतिनिधी**

अटल फाऊंडेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या देशातील एकमेव राष्ट्रीय अटल अलंकार पुरस्कार यंदा वर्धा भाजपाचे जिल्हा अध्यक्ष संजय गाते यांना जाहीर झाला आहे. पंतप्रधान संग्रहालय, तीन मूर्ती मार्ग, नवी दिल्ली येथे शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या ६ व्या राष्ट्रीय अटल पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.अटल फाउंडेशनतर्फे दरवर्षी सामाजिक कार्य, राजकारण, विज्ञान, क्रीडा, कला-संस्कृती, शिक्षण, साहित्य, शौर्य, आरोग्य, स्वच्छ भारत, शेती, सशस्त्र सेना, महिलांचे सशक्तीकरण, मेक इन इंडिया अशा विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांना एकूण २२ पुरस्कार दिले जातात. यापैकी १० राष्ट्रीय अटल अवॉर्ड, ११ राष्ट्रीय अटल भूषण



आणि एकमेव राष्ट्रीय अटल अलंकार पुरस्कार यासाठी यंदा संजय गाते यांची निवड विशेष ठरली.या सोहळ्याला माजी मंत्री डॉ. सत्यनारायण जटिया, फाऊंडेशनचे मुख्य संरक्षक श्याम जाजू, महामंडलेश्वर राजेश ओझा, संसदीय समिती सदस्य अविनाश राय खन्ना, माजी मंत्री संजीव बल्यान, माजी मंत्री अशोक अग्रवाल, बजरंगलाल सांग्रा आदी मान्यवर उपस्थित होते.संजय गाते हे पुलगाव येथील भारतीय जनता पक्षाचे सक्रिय नेते असून ते भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रदेश सहमंत्री, महाराष्ट्र राज्य कुंभार महासंघाचे अध्यक्ष, मातृसेवा मंडळाचे कार्यवाह आणि सेवा फाऊंडेशनचे मार्गदर्शक अशा विविध जबाबदाऱ्यांवर कार्यरत राहिले आहेत. नगरस्तरापासून ते प्रदेशस्तरापर्यंत त्यांनी संघटन कौशल्य दाखवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.या मानाच्या पुरस्कारामुळे वर्धा जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून संजय गाते यांच्या कार्याचा गौरव म्हणून ही निवड अभिमानास्पद ठरली आहे.

# बीड येथे होणार ओबीसीचा महाएल्गार मेळावा लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे-सत्संग मुंडे

## माजलगाव येथे ॲड.सुभाष राऊत यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी समाजाची बैठक संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करून मराठा समाजासाठी ओबीसी करणाचा मार्ग खुला करून दिला आहे. यामुळे ओबीसी प्रवर्गा वर मोठा अन्याय होत असून राज्य सरकारच्या या निर्णया विरोधात देशाचे ओबीसी नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांनी रणसिंग फुंकले आहे.काही झाले तरी ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही यासाठी ना. भुजबळ यांनी लढा उभारला आहे.त्याचाच एक भाग म्हणून बीड येथे रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी ना.छगनराव भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि ओबीसी समाजातील मान्यवर नेत्यांच्या उपस्थितीत ओबीसी समाजाचा महाएल्गार मेळावा आयोजित केला असून या मेळाव्यास जिल्ह्यातील ओबीसी बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सत्संग मुंडे यांनी केले आहे.

माजलगाव येथे दि.२१ सप्टेंबर २०२५ रोजी महाएल्गार मेळाव्याच्या पूर्व तयारी संदर्भात समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील ओबीसी समाज बांधवांची बैठक संपन्न झाली.यावेळी सत्संग मुंडे बोलत होते. या बैठकीस भाजपा भटके विमुक्त आघाडी चे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर सरवदे,नाभिक समाजाचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे,परीट समाजाचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ शिंदे,ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने, माजलगाव पंचायत समितीचे माजी सभापती दिनेश गायकवाड,माजी जिल्हा परिषद सदस्य शिवप्रसाद खेत्रे, संजीवनीताई राऊत, रूपमानंद खेत्रे,बळीराम यादव,संतोष रासवे, जगन्नाथ खेत्री,ओबीसी महासंघाचे तालुका अध्यक्ष शामसुंदर अमर गिरी,पांचाळ ज्ञानेश्वर कोरडे,बाबासाहेब आढाव,शिवाजी आढाव किशोर पांचाळ,महादेव नाना आढाव,शंकर गावडे,कुंडलीक आढाव रामेश्वर आढाव,अनंत आढाव,सचिन रासवे, मछिंद्र आढाव,भरत आढाव,बाबु आढाव, भाऊ कांबळे,अशोक आढाव,सतिश यमगर नारायण आढाव,मयूर पाचाळ आदींची प्रमुख उपस्थिती




होती.यावेळी बोलताना सत्संग मुंडे पुढे म्हणाले की,रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी बीड येथेओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष, राज्याचे कॅबिनेट मंत्री ना.छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचा भव्य महा एल्गार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.हैदराबाद गॅझेटिअरच्या माध्यमा तून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण लागूकरण्याचा जीआर महाराष्ट्र शासनाने काढला असून यामुळे ओबीसी समाजा मध्ये कमालीची भीती आणि सरकार विरोधात प्रचंड असंतोष पसरला आहे.मराठा समाज बांधवांना आरक्षण देण्याला ओबीसी समाजाचा विरोध नाही मात्र ओबीसी समाजा च्या आरक्षणावर अन्याय करणारा निर्णय महाराष्ट्र शासन घेत असल्याने यानिर्णयाच्या विरोधात राज्यातील ओबीसी समाज बांधवां मध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. ओबीसी आरक्षण संपुष्टात येते की काय? या भीतीमुळे ओबीसी समाजातील नागरिक आत्महत्या सारखे पाऊल उचलू लागले आहेत.यामुळे ओबीसी समाजाला धीर देण्या साठी आणि ओबीसी समाजाचे आरक्षण स्वतंत्र आणि अखंड ठेवण्यासाठी या महा एल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यास बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधव आणि भगिनींनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन त्यांनी केले.या बैठकीस माजलगाव तालुक्या तील समता परिषदेचे पदाधिकारी,कार्यकर्ते, ओबीसी समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केज वकील संघाचे नव निर्वाचित अध्यक्ष ॲड.एम.एस लाड तर उपाध्यक्ष ॲड.एस.एल गलांडे व सचिव ॲड.एस.एन अंबाड यांची निवड

**केज । प्रतिनिधी**

केज वकील संघाची निवडणूक नुकतीच पार पडली असुन अध्यक्ष पदी ॲड.एम.एस लाड उपाध्यक्षपदी ॲड.एस.एल गलांडे तर सचिव पदावर ॲड.एस.एन अंबाड यांची निवड करण्यात आली आहे.या बाबत सविस्तर माहिती अशी की,दि.१८ सप्टेंबर रोजी केज वकील संघाची निवडणूक पार पडली.अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत ॲड.एम.एस लाड यांना ८२ तर ॲड.एस.वाय मुंडे यांना ६४ मते मिळाली १८ मताने अड.एम.एस लाड विजयी झाले आहेत.तर उपाध्यक्ष पदासाठी



अड.गलांडे एस.एल यांना ९९ मते मिळाली तर ॲड.ए.बी.सोनवणे ५० मते मिळाली आहेत ॲड..एस.एल गलांडे ४९ मतांनी विजयी झाले आहेत.तर सचिव पदासाठी ॲड.एस.एनअंबाड यांना ७८ मते मिळाली तर ॲड.इतापे पी.डी यांना ६९ मते मिळाली ॲड.एस.एन अंबाड ९ मताने विजयी झाले आहेत.कोषाध्यक्ष पदावर ॲड.एस.एस देशपांडे यांची बिनविरोध निवड झाली आहे तसेच सह सचिव पदावर ॲड.सिरसाट तर ग्रंथपाल म्हणून ॲड.जे.जी बारगजे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अड.एस.सी जाधव यांनी कामकाज पाहिले तर त्यांना ॲड.डब्ल्यु.ए शेख व ॲड.पी.ए हुंबे यांनी सहकार्य केले. केज वकील संघाच्या सदस्यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे स्वागत करुन पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## शेतकऱ्यांना सरसकट भरपाई द्या:पालकमंत्री जयकुमार गोरे

**अक्कलकोट (वृत्तसंस्था)**–अतिवृष्टीमुळे शेतकरी चिंतेत असून मी आधार देण्यासाठी आलो. तालुक्यात सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत, असे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. त्यांनी अक्कलकोट तालुक्यात अतिवृष्टीमुळे पिकांच्या नुकसानीची पाहणी केली.जयकुमार गोरे व आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रमुख अधिकाऱ्यांसोबत तालुक्यातील बादोले, बोरगाव (दे), शिरसी, बोरी, उमरगे या ठिकाणी पाहणी केली. सांगवी येथे शेतकरी, ग्रामस्थ उभे होते. पालकमंत्री व आमदारांनी ताफा थांबवून त्यांच्या व्यथा जाणून घेतली. अतिवृष्टीने तालुक्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. सचिन



कल्याणशेट्टी म्हणाले तालुक्यात प्रचंड नुकसान झाले. मुख्यमंत्र्यांनी सर्व पालकमंत्र्यांना आदेश देत पाहणी करण्यास सांगितले. पालकमंत्री गोरे यांनी स्वतः नुकसान पाहिले. शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची आम्ही काळजी घेत आहोत. असे बोलून त्यांच्या वेदना जाणून घेत मदतीचे आश्वासन दिले.

## सम्यक विद्यार्थी आघाडीचे राज्य प्रवक्ते प्रशांत बोराडे यांचा साळेगाव येथे भव्य सत्कार समारंभ संपन्न

**केज । प्रतिनिधी**

सम्यक विद्यार्थी आघाडीचे राज्य प्रवक्ते प्रशांत बोराडे यांचे साळेगाव येथे आगमन झाले असता गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.या प्रसंगी लक्ष्मण ओव्हाळ जिल्हा सचिव युवक वंचित बहुजन आघाडी बीड पूर्व,तसेच ओबीसी बांधव,मराठा-मुस्लिम बांधव आणि गावातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनी बोराडे यांना शाल,श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव केला.सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय प्रश्नांवर सम्यक विद्यार्थी आघाडीने उभारलेल्या चळवळी बाबत व प्रशांत बोराडे यांच्या कार्याबाबत



या वेळी विशेष कौतुक करण्यात आले.छत्रपती संभाजी नगर वरून सोलापूर कडे जाताना साळेगाव येथे झालेल्या या धावत्या भेटीत भारत बुदगुडे,दत्ता तोंडे, बालाजी पटने,सिद्धेश्वर मुळे,राजाभाऊ पारखे, सोहेलपठाण,राजाभाऊ सरवदे,अशोक बचूटे, बालू मुळे,बिभीषण गित्ते,मोहन पारखे, सय्यद चाँद,सुधीर पारखे,सर्जेराव लांडगे, गणेश वरपे,विक्रम वरपे,बालाजी मेडकर, ओम मुळे,दीपक मुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासाठी वरिष्ठ पॅनेल वकील म्हणून ॲड.सुरेश मुंडे यांची नियुक्ती

**परळी । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या कायदा व न्याय मंत्रालयाने (Department of Legal Affairs - Judicial Section) महाराष्ट्रातील केंद्र सरकारच्या वतीने चालवले जाणारे खटले अधिक प्रभावीपणे लढवण्यासाठी वरिष्ठ पॅनेल वकिलांची नियुक्ती केली आहे.या आदेशानुसार, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासाठी वरिष्ठ पॅनेल वकील म्हणून ड. सुरेश वाल्मिकराव मुंडे यांची कायदा आणि न्याय मंत्रालयाने महाराष्ट्रातील केंद्रीय सरकारच्या वतीने खटले लढवण्यासाठी नियुक्ती केली आहे.



शास्त्री भवन, नवी दिल्ली येथून १५ सप्टेंबर २०२५ रोजी काढलेल्या आदेशानुसार, ते औरंगाबाद खंडपीठ (हायकोर्ट) तसेच राज्यातील विविध जिल्हा आणि अधीनस्थ न्यायालयात तीन वर्षे किंवा पुढील आदेश येईपर्यंत केंद्र सरकारच्या खटल्यांचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

परळीचे भूमिपुत्र ड. सुरेश वाल्मीकराव मुंडे यांनी वकिली क्षेत्रातील वारसा नसतानाही खाजगी वकील ते ८ वर्षे राज्य सरकारचे वकील, Standing Counsel of Union Grant Commission (UGC), DRT, बँकिंग क्षेत्रातील राष्ट्रीयकृत बँकांचे वकील म्हणून, केंद्र सरकारचे डींरपवळपस ऊॅपीशश्र मध्ये कार्य केले असून आता केंद्र सरकार SENIOR PANEL COUNSEL औरंगाबाद खंडपीठ येथे नियुक्ती झाली आहे.या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## शहर बचाव मंचच्या वतीने महिला,बाल अत्याचार व तस्करी विरोधी जिल्हास्तरीय परिसंवाद संपन्न

### महिला व बाल तस्करी एक 'ऑर्गनाइज्ड क्राईम'

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर बचाव मंच व गेल्या २५ वर्षापासून गोवा' सारख्या राज्यात सातत्याने महिला,बाल ट्राफिकिंग आणि रेस्क्यू या विषयांवर प्रत्यक्षात जमिनीवर काम करणारे एन.जी.ओ.-ठन',अर्ज',यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच बीड शहरातील नगर रोड येथील नीलकमल हॉटेल हॉल येथे महिला बाल अत्याचार व तस्करी या विषयांवर जिल्हास्तरीय एक दिवसीय परिसंवाद चर्चा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये फार मोठ्या संख्येने बीड शहरातील व इतर तालुका भागातील सामाजिक पातळीवर प्रबोधन करणारे अग्रणी बुद्धिजीवी, मोठ्या संख्येने वकील संघाची वकील मंडळी, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य मंडळी, विविध संघटना व सामाजिक संस्थांचे प्रमुख पदाधिकारी, पोलीस दलाच्या वतीने महिला पोलीस अधिकारी, विविध पक्षांमध्ये राहून सामाजिक कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेली ज्येष्ठ पदाधिकारी



मंडळी, मोठ्या संख्येने शहरातील जागृत महिला वर्ग, एस.डी.पी.आय पार्टीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, तुळजाभवानी प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, निवृत्त पोलीस व इतर क्षेत्रातील अधिकारी, जिल्हा अंधश्रद्धा निर्मूलनच्या प्रमुख महिला प्रतिनिधी व पदाधिकारी, मोठ्या संख्येने अनेक सामाजिक महिला कार्यकर्त्या व विविध सेवाभावी संस्थांच्या प्रतिनिधी, जिल्हा आरोग्य विभागाचे प्रतिनिधी, विविध वृत्तपत्रांचे पत्रकार प्रतिनिधी व संपादक मंडळी या सर्व शहरातील जनतेच्या उपस्थितीचा सहभाग होता.अशा पद्धतीने शहरातील विविध क्षेत्रांमधील काम करणारे सुज्ञ व जागरूक महिला, पुरुष नागरिक फार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अतिशय शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने ठेवलेला हा कार्यक्रम अनेक विचारवंतांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरामध्ये बऱ्याच काळानंतर पहिल्यांदाच अभूतपूर्वपणे यशस्वी करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने महिला बाल अत्याचार व तस्करी आणि ऑर्गनाईज्ड क्राईम,एक संघटित गुन्हेगारी व तसेच यावरील उपाय योजना, पीडितांचे पुनर्वसन, शासन स्तरावरील व विविध सामाजिक संस्थांचे यामधील योगदान, यासंदर्भामध्ये मदत मिळविण्यासाठीची योग्य ठिकाणे, अशा सर्व विषयांवर उपस्थित विचारवंतांनी माहितीपर सखोल, अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील जनतेने स्वतः जागरूक राहून या सर्व विषयांवर समाजामध्ये जागरूकता आणण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे, ही फार मोठी वर्तमान काळाची व पुढच्या पिढीच्या चांगल्या भवितव्यासाठीची गरज आहे असे या अशा प्रकारच्या विचार मंथनातून निष्पन्न होते. समाज प्रबोधनाच्या कार्यामध्ये 'बीड शहर बचाव मंच' परिवारातील सर्व लोक सातत्याने अग्रणी व समाजामध्ये उघड्या डोळ्याने काम करण्यासाठी सतत तत्पर आणि कटिबद्ध राहतील. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बीड शहर बचाव मंच परिवारातील सर्वांनीच प्रयत्न केले.

## एक शाम मोदीजी के नाम कार्यक्रमात बीड जिल्ह्याचा सन्मान

**केज । प्रतिनिधी**

भारतीय नमो संघाच्या वतीने दिल्ली येथील एन डी एम सी कन्वेक्शन सेंटर,संसद मार्ग नवी दिल्ली येथे एक शाम मोदीजी के नाम कार्यक्रमात बीड जिल्ह्यातील दोघांचा सन्मान करण्यात आला या बाबत सविस्तर माहिती अशी की,दि. १७ सप्टेंबर रोजी भारताचे यशस्वी पंतप्रधान आदरनीय नरेंद्रभाई मोदीजी यांचा वाढदिवस देश विदेशा तील विविध ठिकाणी वेगवेगळया स्वरुपात साजरा केला जातो. यामध्ये सामाजिक उपक्रम,रली,अन्नदान, धार्मिक कार्यक्रम, देशभक्तीपर कार्यक्रम अशा प्रकारची जन हिताची कामे केली जातात.याचाच एक भाग म्हणून एन डी एम सी कनव्हेक्शन सेंटर, संसद मार्ग,नवी दिल्ली येथे एक शाम मोदीजी के नाम हा देशभक्तीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला विशेष आमंत्रण भारतीय नमो संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. भाऊसाहेब घोडके, हेमंत कालीया राष्ट्रीय मंत्री मुंबई,व भारतीय नमो संघाचे केज तालुकाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजचे तालुकाध्यक्ष पत्रकार श्री.चंद्रकांत पाटील यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना आमंत्रित करण्यात आले होते.या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती नमो संघाचे राष्ट्रीय रक्षक श्री.नरेशजी बन्सल संसद सदस्य राज्यसभा राष्ट्रीय कोषाध्यक्ष भारतीय जनता



पार्टी, भाजपा पुर्व सांसद अनिताजी आर्या, वरीष्ठ,नमो संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मन्नुजी तोमर,नमो संघ राष्ट्रीय संघटन मंत्री हेमंत शर्मा, राजनितीज्ञ तथा आर एस एस नेता यांच्यासह विवीध मान्यवर उपस्थित होते.भारतीय नमो संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मन्नुसिंहजी तोमर यांच्या संकल्पने तून हाकार्यक्रम घेण्यात आला.मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यानंतर देश भक्तीपर गितांचा कार्यक्रम शालेय विद्यार्थ्यांचा संपन्न झाला.यावेळी देशभक्ती मुळे भावनिक वातावरण तयार झाले होते.यानंतर स्वदेशी वस्तुंचीच खरेदी करण्यासाठी सर्वांनी शपथ घेतली.मा.खा. नरेशजी बन्सल यांनी भारतीय नमो संघाच्या कार्याची प्रशंसा करून सदैव नमो संघाच्या पाठिशी असल्याची ग्वाही दिली तसेच पंतप्रधान नरेंद्र भाई मोदीजी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.मान्यवरांच्या भाषणानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रम संपन्न झाला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077